रयत शिक्षण संथेचे,

अण्णासाहेव आवटे आर्ट्स, कॉमर्स & हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर

मराठी विभाग

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

अहवाल – २०२५-२६

अहवाल

दि. ०५.०२.२०२६

रयत शिक्षण संस्थेचे, अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** दि.२४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६ या काळात साजरा करण्यात आला. या कालावधीमध्ये विभागाद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरीत्या करण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालयात पुढील उपक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन केले होते.

अ.क्र.	उपक्रम व स्पर्धेचे नाव	सहभागी विद्यार्थी संख्या
१.	**हस्ताक्षर स्पर्धा**	५५
२.	**निबंध लेखन स्पर्धा**	३५
३.	**काव्यलेखन स्पर्धा**	१२
४.	**काव्यवाचन स्पर्धा**	२५
५.	**माहितीपट**	८६
६.	**प्रश्नमंजूषा (online)**	८४

तर २४ जानेवारी, २०२६ रोजी **हस्ताक्षर स्पर्धेचे** आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयातील ५५ विद्यार्थीनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता.या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एस.आर. सालके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .

२५ जानेवारी २०२६ रोजी निबंध व काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयातील विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध विषयावर आपले निबंध लेखन केले. या स्पर्धेत ३५ विद्यार्थी सहभागी झालेले होते. तसेच काव्यलेखन या स्पर्धेत १२ विद्यार्थांनी सहभाग नोंदविला.

मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये काव्य वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना कवितांचे रसग्रहण करता यावे व काव्य निर्मितीची प्रक्रिया समजून घेता यावी म्हणून दि. २७ जानेवारी, २०२६ रोजी **'काव्य वाचन स्पर्धा'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रो. डॉ.गार्डी बी.पी. हे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना कविता म्हणजे काय ? कविता कशी गायली जाते, काव्य लेखनाची प्रक्रिया काशी पार पडते ? इत्यादींची विवेचन करून कवितेचे विविध पैलूवर प्रकाश टाकला. तसेच या प्रसंगी महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यानी स्वलिखित तर काही विद्यार्थ्यानी इतरांच्या कवितांचे सादरीकरण केले. या काव्यवाचन स्पर्धाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रो. डॉ. तोंडे बी. एस. होते. या काव्यवाचन स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्यने सहभागी झाले होते.

दि. २८ जानेवारी, २०२६ रोजी मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विविध वर्गातील मराठीतील नावाजलेल्या व मराठी भाषेच्या विविध महत्त्वपूर्ण घटकांची माहिती देणाऱ्या **माहितीपट** यांच्या चित्रफिती दाखवल्या गेल्या. मराठी कादंबऱ्यावर आधारित मराठी माहितीपट व मराठी भाषा संवर्धन व मराठी भाषा विविध संस्था यांचे कार्य सांगणारे महितीपट दाखवले गेले. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या स्पर्धेत एकूण ८४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

अशा प्रकारे महाविद्यालयात दि.२४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६ या काळात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

या स्पर्धेमधून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढून विजेत्यांना २७ फेब्रुवारी या 'जागतिक मराठी भाषा दिनी' प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.



निमंत्रित मान्यवर प्रो. डॉ.तोंडे बी.एस. विद्यार्थांना मार्गदर्शन करताना




काव्यसंमेलनात अध्यक्षीय मनोगत सादर करताना प्रो. डॉ. गार्डी बी. पी

काव्यसंमेलनात विद्यार्थी कवितांचे वाचन करताना

.













हस्ताक्षर लेखन स्पर्धा





हस्ताक्षर स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी

माहितीपट





